# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार शहरातील एकूण १९१ सार्वजनिक शौचालयाची "सखोल स्वच्छता मोहीम"

दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त मारुती गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार स्वच्छता निरीक्षकांचे ५ गट विभागून शहरातील एकूण १९१ सार्वजनिक शौचालयाची "सखोल स्वच्छता मोहीम" (डीप क्लीन ड्राईव्ह) राबविण्यात आली.

सार्वजनिक शौचालयाची सखोल स्वच्छता मोहीमेत मुख्यतः टाकीची स्वच्छता, जेट स्प्रेचा वापर करून शौचालय धुणे, शौचालयाच्या परिसरातील सखोल स्वच्छता, भिंतीवरील स्टिकर्स काढणे, शौचालयातील तुटलेल्या दरवाज्याची दुरुस्ती करणे इत्यादी कामे सकाळी १०.०० वाजता ते दुपारी २.०० वाजेपर्यंत पूर्ण करण्यात आली. त्याचबरोबर ज्याठिकाणी शौचालयातील मल जमा होणाऱ्या टाक्या पूर्णतः भरत आल्या आहेत त्यांची स्वच्छता ही सकर मशिनच्या सहाय्याने मा. आयुक्त यांच्या उपस्थितीत करण्यात आली. त्याचबरोबर मा. आयुक्त यांनी ६० फूट रोड, मुर्धा खाडी, रेल्वे समांतर रस्ता इत्यादी ठिकाणी शौचालयाच्या सखोल स्वच्छता मोहीमेस भेट देऊन सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" या मोहीमेत शहरातील जबाबदार नागरिकांनी सहभाग नोंदवून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.